सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५

ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/थेट द्वितीय वर्ष पदविका/२०२४/ वर्किंग प्रोफेशनल्स / ५१० दिनांक :१८/१०/२०२४

**प्रवेशासाठीची सुचना**

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम**

**( थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) उमेदवारांच्या स्वतंत्र तुकडीचे प्रवेश )**

संदर्भ : संचालनालयाचे प्रवेशासाठीचे वेळापत्रक क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/थेट द्वितीय वर्ष पदविका/२०२४/ प्रवेशाचा अंतिम दिनांक सुधारित /४६२, दिनांक : २६/०९/२०२४

संचालनालयाच्या संदर्भीय वेळापत्रकान्वये, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता पुर्णवेळ थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशप्रक्रियेसाठी सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक ब संस्थांनी डेटा अपलोड करण्याचा शेवटचा दिनांक २३-१०-२०२४ असा निर्धारित करण्यात आलेला आहे. यामध्ये थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) उमेदवारांच्या स्वतंत्र तुकडीची प्रवेश प्रक्रियादेखील समाविष्ट करण्यात आलेली आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व शासन मान्य नियमावली नुसार वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) करिता स्वतंत्र तुकडी सुरु करण्यासाठी सदर अभ्यासक्रमातील प्रवेश हे मंजूर प्रवेश क्षमतेच्या (⅓) एक तृतीयांश असणे आवश्यक आहे. या परिपत्रकाद्वारे सर्व संबधित उमेदवारांना व संस्थांना कळविण्यात येते की, वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) करिताच्या स्वतंत्र तुकडीकरीता उपलब्ध राहिलेल्या रिक्त जागेवर उमेदवारांना दि. २३-१०-२०२४ सायंकाळी ६.०० पर्यंत प्रवेश घेता येऊ शकतो. मात्र, दि. २३-१०-२०२४ सायंकाळी ६.०० नंतर एखाद्या अभ्यासक्रमातील प्रवेश हे मंजूर प्रवेश क्षमतेच्या (⅓) एक तृतीयांशपेक्षा कमी असतील तर अशा उमेदावारांचे प्रवेश दि. २३-१०-२०२४ नंतर रद्द करण्यात येतील. सदर नियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जवाबदारी संस्थांची राहील. ज्या उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील त्यास सर्वस्वी संबधित उमेदवार व संबधित संस्था जवाबदार राहतील. प्रवेश रद्द झालेल्या उमेदवारांकडुन संस्थेने आकारलेले शुल्क तसेच मुळ कागदपत्रे संस्थेने उमेदवारास एका दिवसाच्या आत परत करावीत, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

( डॉ. विनोद मोहितकर )

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय

महाराष्ट्र राज्य, मुंबई